# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

---

दिनांक १४ ऑक्टोबर, २०२०

## प्रेस नोट

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त मार्गदर्शक सुचनेनुसार कोव्हिड-१९ नियंत्रण करण्याकरिता **"माझे कुटुंब माझी जबाबदारी "** ही मोहिम राबविण्यात येत आहे. सदर मोहिम अंतर्गत शहरातील प्रत्येक घरोघरी भेट देवुन नागरिकांची आरोग्य तपासणी व व्यक्तीश: भेटून आरोग्य शिक्षण देण्यात येत आहे.

सदर मोहिमेमध्ये नागरिकांची आरोग्य तपासणी करण्याकरिता १८८ पथकांची नियुक्ती महानगरपालिके मार्फत करण्यात आलेली आहे. एका पथकामध्ये एक आरोग्य कर्मचारी व स्थानिक लोकप्रतिनिधी मार्फत नियुक्त केलेले दोन स्वयंसेवक (एक पुरुष व एक महिला) यांचा समावेश करण्यात आलेला आहे. नियुक्त पथकास आरोग्य तपासणी किट ( Pluse Oximeter, Thermal Scanner Gun. Sanitizer, Gloves, Mask व औषधे) व CSR निधीमधून टि-शर्ट व कॅपचे वाटप करण्यात आले आहे. यानुसार एक पथक दररोज ५० घरातील नागरिकांचे आरोग्य तपासणी करुन आरोग्य शिक्षण व कुटुंब सर्व्हेक्षण करण्यात आले आहे. सदर मोहिमेच्या पहिल्या फेरी मध्ये उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकुण १,२१,८३१ घरांचे व ४,५८,२४४ लोकसंख्येचे आरोग्य तपासणी व सर्व्हेक्षण करण्यात आले असून ८३०६ -Morbid चे रुग्ण (मधुमेह, हदय विकार, यकृत विकार, किडनी विकार व इतर आजाराने ग्रस्त) आढळुन आले आहेत. तसेच सर्दी, ताप व खोकला लक्षणे असलेले एकुण ९६२ रुग्ण आढळून आले आहेत. त्यानुसार एकुण ९९७ रुग्णांची कोरोना चाचणी करण्यात आली आहे. त्यापैकी कोरोना चाचणी पॉझिटीव्ह असलेले एकुण ७० रुग्ण आढळून आले व त्यांना पुढील उपचाराकरिता कोव्हिड रुग्णालयात संदर्भित करण्यात आले आहे. सदर मोहिमेची पहिली फेरी दिनांक १५/०९/२०२० ते १०/१०/२०२० या कालावधी मध्ये यशस्वीपणे राबविण्यात आली असून दुसरी फेरी दिनांक १४/१०/२०२० ते २३/१०/२०२० या कालावधी मध्ये राबविण्यात येणार आहे.

(डॉ. युवराज भदाणे)
माहिती व जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका